06-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/05/2025 9:58 PM Page 1

निवडक

वन डिचोली येथील महामाया कालिका देवस्थानात आज रामनवमी

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ५ : वन डिचोली येथील श्री महामाया कालिका देवस्थानात रविवार दि. ६ रोजी रामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी ९ वाजता देवकृत्य, दुपारी १२ वाजता रामजन्मोत्सव व पाळणा, आरती व तीर्थप्रसाद, २ वाजता महाप्रसाद, संध्याकाळी स्थानिक कलाकारांचा भजनाचा कार्यक्रम होणार असून कार्यक्रमाचे यजमान श्री. व सौ. मंदिरा मंदार चिबडे आणि कुटूंबिय (वन, डिचोली) हे आहेत. भाविकांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थिती लावावी असे आवाहन देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे

साळ येथील सिद्धेश्वर देवस्थानचा आज वर्धापनदिन व रामनवमी

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. ५ : साळ येथील श्री सिद्धेश्वर देवस्थानचा वाढदिवस व रामनवमी निमित्त शनिवार दि. ५ ते रविवार दि. ६ रोजी विविध धार्मिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार दि. ५ रोजी सकाळी श्री सिद्धेश्वर मंदिरात श्रीचे पूजन, अभिषेक व लघुरुद्र, आरती व तीर्थप्रसाद होईल, दुपारी २ वाजता महाप्रसाद तर संध्याकाळी ७ वाजता ढोल ताशाच्या गजरात अवसारांच्या साथीने श्री भुमिकादेवीची गावात पालखीतून मिरवणूक निघणार आहे सदर पालखी श्री माडयेश्वर देवस्थान च्या प्रांगणात जाऊन तेथील माडावरील श्रीफळ काढून वाढविले जाणार. गावातील सुवासिनी व भाविकांकडून श्रीची खणानारळाने ओटी भरण्याचा कार्यक्रम होईल. पालखीचे सिद्धेश्वर देवस्थानच्या प्रांगणामध्ये पुनारागमन झाल्यानंतर रात्री १०.३० वाजता श्री सिद्धेश्वर नाट्य मंडळ – वरचावाडा सादर करणार आहेत . नकुळ राऊत निर्मित रमाकांत शं. पायाजी लिखित व भिकाजी (बाबलो) पडवळ दिग्दर्शित तीन अंकी सामाजिक नाटक संगीत घर माझे देवघर सादर केले जाईल. या नाट्यप्रयोगात नकुळ राऊत, विजय हळर्णकर, प्रशांत राऊत, भिकाजी पडवळ, रवींद्र राऊत, राजन नाईक, प्रवीण पडवळ, सज्ञन नाईक, सद्गुरू घुरे, विशाल चोडणकर व सोनिया शेटये आदी कलाकार सहभागी होणार आहेत . रविवार दि. ६ रोजी रामनवमी निमित्त दुपारी १२ वाजता श्री सिद्धेश्वर देवस्थान च्या प्रांगणात श्री रामजन्म सोहळा होणार, तीर्थ प्रसाद झाल्यानंतर फळफळावळीची पावणी केली जाईल. रात्री ९.३० वाजता श्री सिद्धेश्वर नाट्यमंडळ – वरचावाडा साळ तर्फे देऊ (आपा) राऊत निर्मित अण्णासाहेब किर्लोस्कर लिखित प्रदिप शिवकर दिग्दर्शित तीन अंकी अजरामर पौराणिक नाटक संगीत 'सौभद्र' सादर केले जाणार आहे. या नाट्यप्रयोगात अभिषेक भिवा राऊत, श्रद्धा जोशी, शारदा शेटकर, सुनील पडवळ, देऊ (आपा) राऊत, उमेश नाईक, राजन पडवळ, श्रीश पडवळ, आकाश राऊत, पुजा पालव, शेखर राऊत, आशिष राऊत, प्रथमेश पांढरे, लक्ष्मण वर्दम, अथर्व राऊत ,श्रेया पडवळ, स्वरा पडवळ आदी कलाकार भाग घेणार आहेत . या नाट्यप्रयोगास ऑर्गन साथ प्रदीप शिलकर, तबला – सूर्या शेट्ये, पार्श्व संगीत – सत्यवान नाईक, प्रकाश योजना – तेजस खेडेकर, ध्वनी संयोजन – सुभाष शिरोडकर (बांदा), तर सहायक संतोष मातोंडकर व समीर शेटगावकर आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन व व्यवस्थापन– वरचावाडा साळ ग्रामस्थ यांचे आहे.

लक्ष्मीनारायण मंदिरात आज रामनवमी उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. ५ : आर्ला – केरी येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिरात रामनवमी उत्सवानिमित्त रविवार दि. ६ रोजी श्री रामजन्म उत्सव साजरा होणार असून त्याप्रित्यर्थ मंदिरात सकाळी धार्मिक विधी व दुपारी १२ वाजता रामजन्म, नंतर आरती, तिर्थप्रसाद होणार आहे. तरी सर्व महाजन तसेच भाविकांनी उपस्थित राहून तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री शांतादुर्गा (सातेरी) देवालय समितीतर्फे करण्यात आले आहे.

विवेकानंद ज्ञान मंदिर हायस्कुलमध्ये आज विद्यार्थी गौरव सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ५ : केरी – सत्तरी येथील स्वामी विवेकानंद स्मृती संघ शिक्षण संस्था संचालित विवेकानंद ज्ञानमंदिर माध्यमिक विद्यालयाच्या दहावीच्या एप्रिल २०२४ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा रविवार दि. ६ रोजी सकाळी १० वाजता विद्यालयाच्या सभागृहात गौरव समारंभ आयोजित करण्यात आलेला आहे. सतत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवलेल्या विद्यालयाच्या सहाव्या तुकडीचा हा सत्कार समारंभ आहे. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून गोवा अग्नीशमन आणि आपत्कालीन सेवा खात्याचे संचालक नितीन रायकर उपस्थित राहणार आहेत.तसेच केरी जिल्हा पंचायत सदस्य देवयानी गांवस आणि केरीच्या सरपंच सुप्रीया गावस उपस्थित असतील.तसेच या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष नामदेव गावस व व्यवस्थापक दिनेश माईणकर हजर असतील.संचालक नितीन रायकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येईल. विवेकानंद ज्ञानमंदिर माध्यमिक विद्यालयाचा हा सतत सहाव्यांदा शंभर टक्के निकाल लागलेला आहे. एकूण ३७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्या सर्व विद्यार्थ्यांना खास प्रमाणपत्र वा मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षिका गौरवी गावस करणार आहे.विवेकानंद ज्ञानमंदिर माध्यमिक विद्यालयाच्या सवाव्या तुकडीच्या विद्यार्थ्यांनी व पालकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यालयाने केले आहे.

संभाजीनगर येथे आज अभ्यंकर बुवांचे कीर्तन

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ५ : नवेवाडे संभाजीनगर वास्को येथे हनुमान देवस्थानात श्री हनुमान जन्मोत्सवाअंतर्गत रविवार दि. ६ रोजी रामनवमी प्रित्यर्थ सांखळी येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. दत्तगुरुबुवा अभ्यंकर यांचे सकाळी १० ते १२ यावेळेत कीर्तन होणार आहे.नंतर श्रीरामाचा पाळणा, आरती, तीर्थप्रसाद,होणार आहे.कीर्तनासाठी तबलासाथ अमेय पटवर्धन तर हार्मोनियमसाथ श्री. होनावरकर यांची आहे. या कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन देवस्थातर्फे करण्यात आले आहे.

न्हावेली साखळी श्री कुळकार देवाचा उद्या वर्धापन दिन

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ५ : न्हावेली सांखळी येथील श्री कुळकार देवाचा वर्धापन दिन सोहळा सोमवार दि. ७ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांनी संपन्न होणार आहे. यानिमित्त सकाळी ९ वाजता गणेश पूजन,पुण्याहवाचन पूर्वक लघुरुद्र, स्वाहाकार विधी होईल. दुपारी १२.३१ वाजता पूर्णाहुती, आरती, तीर्थप्रसाद, महाप्रसाद होईल. यावेळी भाविकांनी देवता आशीर्वादाचा लाभ घ्यावा. संध्याकाळी ५ वाजता हरिपाठ त्यानंतर पावणी आणि संध्याकाळी ७.४५ वाजता भगतवाडा आमोणे महिलांतर्फे प्रल्हाद केशव अत्रे लिखित व शिवनाथ सदू नाईक दिग्दर्शित नाटक 'संगीत प्रीतीसंगम' हे नाटक सादर होईल. या नाटकाचे सूत्रधार नारायण गोवेकर आहेत असे श्री लक्ष्मीनारायण देवस्थान समिती न्हावेली – साखळीतर्फे कळविण्यात आले आहे.

दिल्ली कॅपिटल्सने साधली विजयाची हॅट्ट्रिक

राहुलचे ७७ धावांची उत्कृष्ट खेळी | अक्षर पटेल आणि समीर रिझवी यांचे महत्त्वपूर्ण योगदान

चैनई, दि. ५ :

दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने बलाढ्य चेन्नई सुपर किंग्सचा २५ धावांनी मोठा पराभव केला आहे. यासह दिल्ली कॅपिटल्सने विजयाची हॅटट्रिक साधली आहे. चेन्नई सुपर किंग्स संघाला त्यांच्या घरच्या मैदानावर पुन्हा एकदा मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. दिल्ली कॅपिटल्स संघाने या विजयासह १५ वर्षांनंतर चेपॉकच्या मैदानावर विजयाची नोंद केली. दिल्लीने दिलेल्या १८४ धावांचा पाठलाग करताना चेन्नईचा संघ २० षटकांत ५ विकेट्स गमावत १५८ धावा केल्या.

दिल्ली कॅपिटल्सने अष्टपैलू कामगिरी करत चैन्नईला पराभवाचा दणका दिला. यासह दिल्लीने यंदाच्या मोसमात विजयाची हॅट्रिक नोंदवून गुणतालिकेत पहिले स्थान गाठले. त्याचवेळी चेन्नईला सलग तिसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. धोनीसाठी हा सामना देखील खास होता कारण पहिल्यांदाच धोनीचे आई–वडील त्याला पाहण्यासाठी स्टेडियममध्ये आले होते, पण त्यांच्यासमोर धोनीला संघासाठी विजयी कामगिरी करता आली नाही.

चेपॉकवर झालेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १८३ धावा केल्या. दिल्लीसाठी, त्यांचा नवा स्टार खेळाडू केएल राहुलला यावेळी सलामीला उतरावे लागले, कारण सलामीवीर फाफ डू प्लेसिस दुखापतीमुळे सामना खेळणार नव्हता. राहुलने या संधीचा फायदा घेत कठीण परिस्थितीतही उत्कृष्ट अर्धशतक झळकावले.

चेपॉकवर झालेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १८३ धावा केल्या. दिल्लीसाठी, त्यांचा नवा स्टार खेळाडू केएल राहुलला यावेळी सलामीला उतरावे लागले, कारण सलामीवीर फाफ डू प्लेसिस दुखापतीमुळे सामना खेळणार नव्हता. राहुलने या संधीचा फायदा घेत कठीण परिस्थितीतही उत्कृष्ट अर्धशतक झळकावले. राहुलने ५१ चेंडूत ६ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ७७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्याच्याशिवाय अभिषेक पोरेलने झटपट ३३ धावा केल्या, तर ट्रिस्टन स्टब्स, कर्णधार अक्षर पटेल आणि समीर रिझवी यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले. यासह संघाने १८३ धावांचा टप्पा गाठला.

अखेरच्या षटकांमध्ये मथीशा पथिरानाने दिल्लीच्या धावसंख्येवर अंकुश ठेवत मोठी धावसंख्या करण्यापासून रोखले, पण सीएसके संघाचे फलंदाज मात्र ही धावसंख्या गाठण्यातही अपयशी ठरले. खलील अहमदने २ विकेट्स तर जडेजा, नूर अहमद, मथीशा पथिराना यांनी प्रत्येकी १–१ विकेट घेतली.

चेन्नईने २०१९ पासून, आयपीएलमध्ये १८० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य गाठले नाही. संघाचा हा ट्रेंड यावेळीही कायम राहिला. पॉवरप्लेमध्ये पुन्हा एकदा संघाची सुरुवात खराब झाली आणि नवीन सलामीची जोडीही काही चांगली कामगिरी करू शकली नाही. संघाने अवघ्या ६ षटकांत ३ गडी गमावले होते, तर ११ व्या षटकापर्यंत संघाने ७४ धावांत ५ विकेट्स गमावले. चेन्नईचा प्रत्येक फलंदाज धावांसाठी झुंज देताना दिसला. धोनी आणि विजय शंकर दोघेही मैदानावर खेळताना मोठे फटके खेळण्यासाठी झगडताना दिसले.

तिसऱ्या षटकात क्रीजवर आलेला विजय शंकर पहिल्याच चेंडूपासून धावांसाठी झगडताना दिसला आणि त्याच्या सर्वोत्तम प्रयत्नानंतरही त्याच्या बॅटमधून एकही मोठा शॉट पाहायला मिळाला नाही. दरम्यान त्याला तीन वेळा जीवदान मिळाले. त्यानंतर एमएस धोनी ११व्या षटकात मैदानात आला. पण धोनीही धावांसाठी झगडताना दिसला. मात्र हे दोन्ही फलंदाज संघाला आवश्यक ती गती देऊ शकले नाहीत. फिनिशर धोनीने २६ चेंडूत १ चौकार आणि १ षटकारासह ३० धावा केल्या.

दिल्लीने दुसऱ्या डावात उत्कृष्ट गोलंदाजी चेन्नईच्या फलंदाजांना धावा करण्याची संधी दिली नाही. दिल्लीकडून फिरकीपटू विपराज निगमने शानदार गोलंदाजी करत २७ धावा देत २ विकेट्स घेतले. तर कुलदीप, स्टार्क, मुकेश कुमारने १–१ विकेट घेतली.

पिळर्ण येथे 'व्हॉट वूमन कॅरी' शीर्षकाखाली चित्रप्रदर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ५ : पिळर्ण औद्योगिक वसाहतीमधील म्युझियम ऑफ गोवा (मोग) मध्ये 'व्हॉट वूमन कॅरी' या शीर्षकाखाली गोमंतकीय प्रतिभाशाली चित्रकार हर्षदा केरकर आणि चैताली मोरजकर यांचे आगळे चित्रप्रदर्शन सध्या सुरू आहे व ते १८ मे पर्यंत चालणार आहे. महिलांवरील मानसिक ताण आणि त्यातून मुक्त होण्यासाठीच्या शक्यतांचा वेध यावर चित्रकृती आधारलेल्या आहेत व त्यातील प्रतिकात्मक चित्रण अत्यंत प्रभावी आहे. हर्षदा यांनी गोव्यातील बाजारपेठेत पारंपरिक वस्तूंची विक्री करणाऱ्या महिलांचे चित्रण करतांना वास्तव आणि रूपकात्मक अशा दोन्ही तणावांनी वाकलेल्या स्त्रिया साकारल्या आहेत. महिला वाहत असलेले ओझे, डोक्यावरील तो भार त्यांनी प्रतिकात्मकरित्या छान चित्रित केला आहे. एक भला मोठा भोपळा डोक्यावर तोलणाऱ्या महिलेचे दहा फूट उंचीचे रेखाचित्र तर बोलके आहे. चैताली यांचा अतिवास्तववादी दृष्टिकोन अपेक्षांच्या भारापासून मुक्त असणाऱ्या महिलांचे चित्रण कल्पकतेने करतो. वास्तवाची मर्यादा ओलांडून कर्तव्य आणि सहनशीलता जपणाऱ्या स्त्रीत्वाचे मूर्त स्वरूप त्या साकारतात. महिला त्यांच्यावर लादलेल्या गोष्टीं धुडकावून स्वतःला सिद्ध करतात, त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद चैताली नेमकेपणाने आविष्कृत करतात. गोव्यातील घरांमध्ये आढळणाऱ्या टेराकोटाच्या भांड्यांवर त्यांनी प्रतिमा रंगवून परिणाम साधला आहे.

अध्ययन फाउंडेशनतर्फे फुटबॉल प्रशिक्षणार्थींना कीटचे वाटप

■ टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. ५ : अध्ययन फाउंडेशनतर्फे फुटबॉल प्रशिक्षणार्थींना मोफत कीटचे वाटप.

अध्ययन फाउंडेशनच्या फील्ड कनेक्ट उपक्रमांतर्गत, शासकीय माध्यमिक विद्यालय नादोडा, रेवोडाच्या एकूण ४५ फुटबॉल प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना फुटबॉल प्रशिक्षणासाठी आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

या मुलांना जो किट देण्यात आला त्यात १ लिटर मिल्टन पाण्याची बाटली, १ बॅग, १ जर्सी, १ जोडी शॉर्ट्स आणि १ जोडी सॉक्स यांचा समावेश आहे. अध्ययन फाउंडेशनचे वरिष्ठ प्रशिक्षक नितीन फडते, कार्यक्रम संयोजक साक्षी वेंगुर्लेकर यांच्या उपस्थितीत विद्यालयाचे मुख्याध्यापक नरेंद्र नाईक यांच्या हस्ते या वस्तूंचे वितरण करण्यात आले. यावेळी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. गेल्या एक वर्षापासून अध्ययन फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून शासकीय माध्यमिक विद्यालय नारोडा रेवोडा येथे विद्यार्थ्यांना फुटबॉल खेळाचे प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी त्याने विद्यालयाच्या खेळ मैदानाला आवश्यक त्या गोष्टी देखील उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

वक्तृत्व स्पर्धेत धनश्री जाधवचे यश

■ टीम दैनिक हेराल्ड

गुळेली, दि. ५ : नांदेड (महाराष्ट्र) – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने महाराष्ट्र आणि गोवा या दोन राज्यांमध्ये राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दीच्या निमित्ताने ही स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत महाराष्ट्र आणि गोवा या दोन राज्यांतील १८ विद्यापीठांमधील ७८ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. भारतीय संविधान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, भारतीय शिक्षण पद्धती, विकसित भारत आणि राष्ट्रविकासात माझी भूमिका या विषयांवर स्पर्धकांनी आपली वक्तृत्वकला सादर केली.

या स्पर्धेत गोव्यातील शासकीय महाविद्यालय, साखळी येथील धनश्री विजय जाधव हिने राष्ट्रविकासात माझी भूमिका' या विषयावर प्रभावी भाषण सादर करून उत्तेजनार्थ बक्षीस पटकावले. तिच्या उत्कृष्ट प्रदर्शनाबद्दल तिला रुपये २,००० आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात इंजि. नारायण चौधरी, अधिसभा सदस्य ॲड. युवराज पाटील, डॉ. हनुमंत कंधारकर, डॉ. विजय भोपाळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी विजेत्या स्पर्धकांचे कौतुक करून त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संदीप काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सिनेट सदस्य डॉ. विजय भोपाळे यांनी मानले.

सेंट्रल स्ट्रायकर्स, ओमटेक्स वेस्टर्न लायन, वेस्टर्न युनायटेड, क्रिकोकर्स हॉस्पिटॅलिटी विजयी

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ५ : क्रिकोकर्स हॉस्पिटॅलिटी गोवा यांनी आयोजित केलेल्या क्रिकोकर्स ५० प्लस क्रिकेट बॅश स्पर्धेत शनिवारी चिखली मैदानावर वेस्टर्न युनायटेडने रायझिंग स्टार्स व्हेटरन्स नवी दिल्लीचा ५ गडी राखून पराभव केला. ओमटेक्स वेस्टर्न लायन मुंबईने आर्लेम मैदानावर स्प्रिंग फाल्कन शेष भारत संघाचा ६ गडी राखून पाडाव केला. सकाळच्या सत्रात हे दोन्ही सामने झाले. दुपारच्या सत्रात एमसीसी मैदानावर सेंट्रल स्ट्रायकर्स इंदूरने धारवाड क्रिकेट अकादमीचा १५८ धावांनी दारुण पराभव केला. यजमान क्रिकोकर्स हॉस्पिटॅलिटी गोवा संघाने एमसीसी मैदानावर पलक्कड व्हेटरन्सवर सहा गडी राखून मात केली.

संक्षिप्त धावफलक

चिखली मैदान – रायझिंग स्टार व्हेटरन्स नवी दिल्ली – २० षटकांत ७ बाद १५१ (विश्वजीत नायक ५१, राजवंश रैना ३७, आशिष पारेख १४–२, मनोज ओझा २२–२) पराभूत वि. वेस्टर्न युनायटेड – १८.५ षटकांत ५ बाद १५३ (राकेश बेडसे ५०, मनोज ओझा ३३, दाबू कौल, समीर मुखर्जी, राजवंश रैना व संजय प्रत्येकी १ बळी).

आर्लेम मैदान – स्प्रिंग फाल्कन शेष भारत – २० षटकांत ९ बाद १५६ (राजेश गिल ५१, आशिष बिस्त २६, अशोक सेठ १९–२, गुरदीपसिंग जगदेव २५–२) पराभूत वि. ओमटेक्स वेस्टर्न लायन मुंबई – १९ षटकांत ४ बाद १५८ (मकरंद कुलकर्णी ४९, सारंग डेगवेकर नाबाद ४४, नीलेश नाईक, राजेश गिल, जयेश शर्मा व बिजू नायर प्रत्येकी १ बळी).

एमसीसी मडगाव : सेंट्रल स्ट्रायकर्स इंदूर – २० षटकांत ६ बाद २१८ (संदीप मेहरोत्रा ५५, मनोज कंधारी ५१, विनायक सामंत ४६, दिनेश शर्मा नाबाद ३१, श्रीनिवास २५–२) विजयी वि. धारवाड क्रिकेट अकादमी – १६.१ षटकांत सर्वबाद ६० (पूर्णचंद्र १५, सुब्रमण्य १५, संदीप मेहरोत्रा ७–२, जमिल खान, शेख सादिक, चंद्र प्रकाश, अजय द्विवेदी, दिनेश शर्मा व संजय चौबे प्रत्येकी १ बळी).

एमसीसी मडगाव – पलक्कड व्हेटरन्स केरळ – २० षटकांत ८ बाद १३४ (सिद्धू पुजारी ५१, संजू २१, सत्येश कामत २०–२, महेश कुडचडकर १९–२, सर्वेश कामत १३–२) पराभूत वि. क्रिकोकर्स हॉस्पिटॅलिटी गोवा – १७.२ षटकांत ४ बाद १३६ (विनय सांबारी ४५, अनुप कुडचडकर ३७, महेश कुडचडकर नाबाद २१, संजू, रवींद्रन, अभय घाटे व राम कुमार प्रत्येकी १ बळी).

जसप्रीत बुमराह लवकरच मैदानात

मुंबई, दि. ५ :

मुंबई इंडियन्स आयपीएल २०२५ मध्ये जसप्रीत बुमराहची आठवण येत आहे. संघाला चार सामन्यांमध्ये ३ पराभवांचा सामना करावा लागला आहे, परंतु आता बुमराहच्या दुखापती आणि पुनरागमनाबद्दल एक मोठी अपडेट आली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, बुमराह पुढील एक–दोन दिवसांत मुंबई इंडियन्सच्या कॅम्पमध्ये सामील होऊ शकतो. काही दिवसांपूर्वी असा दावा करण्यात आला होता की बुमराह ७ एप्रिल रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात खेळू शकतो.

जसप्रीत बुमराह पुढील एक–दोन दिवसांत एमआय कॅम्पमध्ये सामील होणार आहे. कोणत्याही सामन्यासाठी मैदानात उतरण्यापूर्वी त्याला स्वतःला तंदुरुस्त असल्याचे सिद्ध करावे लागेल. पुनरागमनापूर्वी स्वतःला तंदुरुस्त सिद्ध करण्यासाठी बुमराहला २ सराव सामने खेळावे लागतील. बुमराह ७ एप्रिल रोजी आरसीबीविरुद्धच्या सामन्याला मुकू शकेल, परंतु १३ एप्रिल रोजी दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात तो खेळेल हे निश्चित आहे.

बॉर्डर–गावस्कर ट्रॉफीमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाचव्या सामन्यापासून जसप्रीत बुमराह क्रिकेटच्या मैदानावर खेळू शकलेला नाही. त्याला त्याच्या पाठीच्या भागात त्रास होत आहे. मुंबई इंडियन्ससोबतच, बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकालाही बुमराह पूर्णपणे तंदुरुस्त झाल्यानंतरच परतावा याची खात्री करायची होती. बुमराहच्या अनुपस्थितीत, एमआय संघाने आतापर्यंत सत्यनारायण राजू, विघ्नेश पुथूर आणि अश्वनी कुमार यांना पदार्पण केले आहे. तिघांनीही त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीने प्रभावित केले आहे परंतु मुंबई संघाला आतापर्यंत हंगामातील चार सामन्यांमध्ये फक्त एकच विजय मिळवता आला आहे. सध्या ट्रेंट बोल्ट आणि दीपक चहर मुंबईच्या वेगवान गोलंदाजीचे नेतृत्व करत आहेत, बुमराहच्या पुनरागमनामुळे मुंबई संघाला वेगवान गोलंदाजीत बरीच ताकद मिळेल. बुमराहच्या पुनरागमनाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २१३ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 213 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .